# आभाळाचे गाणे

रवींद्र भट

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**आभाळाचे गाणे**
रवींद्र भट

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
रवींद्र भट
एफ-२, सप्तशृंगी अपार्टमेंट, पहिला मजला,
१५११-ब, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २४०/-

माझे वडील बंधू
श्री. अशोक भट
आणि
सौ. सुमन वहिनी
यांना

# आभाळाचे गाणे

क्षितिजावरची सीमारेषा कवेत घेणे।
आभाळाचे गाणे।।ध्रु.।।

सूर्यरथाच्या अश्वासंगे,
गुरुशुक्रांच्या भ्रमणासंगे,
दिक्कालाचे बंधन तोडुन,
अनंतरूपी उरणे।।१।।

असेल जेथे सजीव सृष्टी,
करणे तेथे पायस वृष्टी,
मातीमधल्या वात्सल्याला,
स्पर्शुन जागे करणे।।२।।

ज्वालामुखिची दुर्गम शिखरे,
रण वाळूचे कोठे विखरे।
जलचर भूचर सर्वांवरती,
नील छत्र मज धरणे।।३।।

यज्ञ घडावा सदा अलौकिक,
स्वर ह्रदयातुन उमटो सात्त्विक।
जगन्नियंता म्हणो तथास्तु,
तम दुरिताचे विरणे।।४।।

✦✦✦

# पर्व पहिले

क्षितिजावर शुक्राची चांदणी उमटली. कुंभार्लीच्या डोंगरउतारावरील जंगलातली पाखरं चिवचिवाट करून परस्परांना पहाटेची साद द्यायला लागली. घाटमाथ्यावरील क्षितिजरेषा कळत नकळत गुलाबी होऊ लागली. घनदाट वनराईमधून अजूनही चांदणं झिरपत होतं आणि डोंगरकुशीतल्या वळत्या पाऊलवाटेवर रांगोळी रेखत होतं. साऱ्या आसमंतात एक नीरव शांतता भरून राहिली होती. रात्रभर चरून विसावलेली हरणं, सांबरं जंगलाच्या आतल्या भागात करवंदीच्या आडोशाला चारी पाय मुडपून, डोळे मिटून, एकमेकांच्या मानेवर मान टाकून शांत निजली होती. खैराच्या, अंजनाच्या शेंड्यांवर, फांद्यांना लटकून बसलेली वानरं आपापल्या पिल्लांना पोटाशी घेऊन आदल्या दिवशी मिळालेल्या रानमेव्याचा सुखद आठव काढीत होती. सारा आसमंत स्तब्ध होता. मंद वाऱ्याबरोबर जंगलातील विविध रानफुलांचा एक अबोध, हवाहवासा वाटणारा आणि शरीराच्या साऱ्या गात्रांना उत्साहित करणारा परिमळ सभोवती सुटला होता.

शुक्राच्या चांदणीवर लक्ष ठेवून कुंभार्लीचा अवघड घाट दोन्ही गुडघ्यांवर हात ठेवून मोठ्या कष्टानं चढणारी गोदाक्का पळभर उभी राहिली. तांबड्या आलवणाचा पदर कानामागे घेत तिनं ओचापदर सावरला, डोळ्यावर हात ठेवून डोंगरमाथ्याची क्षितिजरेषा निरखली. पहाटेचा प्रसन्न परिमळ आपल्या श्वासात साठवून घेत तिनं प्रसन्न चित्तानं येणाऱ्या नव्या दिवसाचं स्वागत केलं. एका बैठ्या शिळेवर टेकत ती अभावितपणे म्हणू लागली,

''उठा उठा सगळिक। वाचे वदावा गजमुख ।
ऋद्धिसिद्धीचा नायक। सुखकारक सर्वांसी ।।''

तिच्या या आवाहनाने जणू सारी पक्षिसृष्टी जागी झाली. चिमण्या, भोरड्या जाग्या झाल्या. एकवार आपले पंख झटकून त्यांचा थवा आकाशात उडाला. त्यांच्या चिवचिवाटानं सारा परिसर निनादून गेला. पूर्वक्षितिज सोनेरी रंगानं न्हाऊन

निघालं. लक्षावधी तेजोकिरणांनी आकाशाला गवसणी घातली. त्या तेजाच्या दर्शनानं गोदाक्काचा शीण कुठल्याकुठं पळाला.

''आक्का, आज गजमुखाची स्तुती करतीयस्. साताऱ्याला पोहोचू त्या वेळी प्रत्यक्ष हत्ती येईल समोर त्या वेळी बिचकू नको म्हणजे झालं!''

आक्काच्या पाठोपाठ येणारे दामोदरपंत खांद्यावरची पडशी खाली ठेवून तळपायात बोचलेला काटा उपटून काढीत म्हणाले. आक्का प्रसन्नपणे हसली. म्हणाली,

''तुझ्यासारखा पहाडाच्या छातीचा भाऊ बरोबर असताना मी कशाला बिचकेन? अगदी इंद्राचा ऐरावत आला तरी चालेल. मी आपली तुझ्या पाठीची ढाल करून निश्चिंत उभी राहीन.''

''आणि ऐरावतानं मलाच आपल्या पायाखाली तुडविलं तर...?''

दामोदरपंत पाठीमागच्या तळकोकणाकडे एकटक पाहात उद्गारले.

''सकाळच्या प्रहरी असं अभद्र कशाला बोलतोस बाबा... वळचणीच्या जखिणी ऐकत असतात. आधीच अशुभाचं सावट आहे आपल्याभोवती...!''

गोदाक्का हताशपणे म्हणाली.

दामोदरपंत कसनुसे हसले. म्हणाले,

''अशुभाकडे पाठ फिरवायला तूच शिकवलंस ना आक्का? घरातल्या भाऊबंदकीला कंटाळून नेसत्या वस्त्रानिशी घराबाहेर पडलो. एका शब्दानं, कोणी कुठं निघालास, म्हणून विचारलं नाही. पाठीमागे येणाऱ्या सावित्रीचे पाय दाराच्या उंबरठ्याशी अडखळले. तूच तिला बाहेर ढकललंस. दांडीवरचं आलवण काखोटीला मारलंस आणि आमच्या मागं त्या घराकडे कायमची पाठ फिरवून तूही आलीस. आता आम्हा दोघांना आहे कोण तुझ्याशिवाय?''

दामोदरपंतांच्या मनात घरातील भाऊबंदकीचं मोहोळ उठलं. इनमीन तीन तर भाऊ. खांद्याला खांदा देऊन उभे राहिले असते, तर इकडचं जग तिकडं करता आलं असतं. बागेत पन्नास-साठ झाडं. शंभरावर कलमं. डोंगर फोडून तयार केलेली दहावीस एकर भातशेती. बारमास पाणी देणारा पऱ्ह्या. विहिरीवर पंचवीस सुगडांचा रहाट. तीन भावांना पुरून उरेल इतकं वाडवडिलांनी ठेवलेलं; पण तिघांच्या तीन तऱ्हा. थोरला दादा स्वार्थी. मधला अण्णा व्यसनी. सदैव गांजाच्या तारेत. धाकटा दामोदर गड्यासारखा राबायचा; पण एका कवडीलाही महाग. कपाटाच्या चाव्या दादाहाती. वर्षाकाठी नव्या पंच्याचं पान काही त्याच्या हातून सुटायचं नाही. एवढा

मोठा खोत; पण देवीच्या उत्सवाला एक आणा काही वर्गणी द्यायचा नाही. दोन पोफळांवर भागवायचा.

दामोदरपंतांच्या मनात गावदेवीच्या उत्सवाचा प्रसंग जसाच्या तसा साकार झाला. आक्का गावदेवीला कसला तरी नवस बोलली होती. एकवीस नारळांचं तोरण बांधून तो या साली फेडायचा होता. आक्का सोवळी होऊन घरी परत आलेली. घरात तिची जागा फक्त चुलीपुढं. तनसडीवरही तिचा अधिकार नाही. तिचा नवस फेडणार कोण? दादा असा. अण्णा तसा. शेवटी मी मनावर घेतलं. दादा सड्यावर गेला होता. मी सुगडं उतरवून घेतली. काथ्याच्या दोरीत तोरण गुंफलं. पडवीतून अंगणात आलो. गडग्याची कुपाटी दूर करून हाती तोरण घेऊन गावदेवीकडे निघालो. वडाखालून दादा येत होता.

''कुठं चालवलं तोरण...?''

दादानी आडवं येत विचारलं.

''गावदेवीला बांधायचं आहे. आक्का नवस बोललीय्...!''

मी समजूत काढायचा प्रयत्न केला.

''तिचा नवस तिला फेडू दे की! त्यासाठी माझ्या बापाची सुगडं कशाला?''

दादा माझ्या हातचं तोरण ओढून घेत म्हणाला.

''आपल्या नारळात तिचाही अधिकार नाही का? सख्खी बहीणच आहे ना ती आपली?''

मी शांतपणे विचारलं.

''हंडाभर सोनं ओतलाय् तिच्या लग्नात. ते तिकडच्यांनी दडपलं. आता सोवळी होऊन परत आलीय्, दोन वेळ पेज जेव म्हणावं. असले नवसबिवस नाही चालणार...!''

दादा, उपरणं झटकीत म्हणाला.

''ठीक आहे. आक्काचा नसेल पण माझा तरी हक्क आहे ना या नारळांवर?''

मी निग्रहीपणानं विचारलं.

''मला हक्क सांगतोस? ढुंगणावर पाणी घालण्यापासून केलं तुझं. दुखणीबहाणी काढली. चांगले पांग फेडलेस बरं...!''

दादा अंगावर धावून येत म्हणाला.

''दादा तू काही म्हणालास तरी मी आज हे तोरण बांधणारच...!''

मी ठामपणे उद्‌गारलो.

''दाम्या, आवाज चढवू नको. बाग शिंपायची अक्कल नाही. देवीला तोरणं बांधताहेत. फिर माघारा. घरी चल आधी. हिश्शांचा तुकडा पाड आणि मग तुझा हिस्सा उधळ हवा तसा.''

दादा अगदी टोकाचं बोलला. माझं मन सुटलं. मी तिरिमिरीत घरी आलो. आक्काला सारं महाभारत सांगितलं. तिनं डोळ्याला पदर लावला. सावित्री स्तंभित झाली. या घरात घोटभर पाणीही न पिण्याचा निर्णय घेतला. या स्वार्थी, कोत्या आणि अहंमन्य भावांच्यापासून दूर जाऊन स्वत:च्या पायावर उभं राहण्याची मी प्रतिज्ञा केली. त्या वास्तुपुरुषाला नमस्कार केला आणि मागं वळूनही न पाहता मी झपाट्याने उगवतीच्या सड्याकडे निघालो. पाठीमागून आक्का आणि सावित्री येत आहेत याचं भान मला सड्यावर आल्यावरच झालं...!

तीन दिवसांपूर्वी फणसवळ्याला घडलेली घटना दामोदरपंतांच्या डोळ्यांसमोर जशीच्या तशी उभी राहिली.

पाठीमागून हळूहळू येणारी सावित्री थबकली. कमरेवरचं कपड्यांचं गाठोडं पायाशी ठेवीत म्हणाली...

''आता कशाला काढायचं ते मागचं! इकडून देशावर जाणं होतंय्. माणसांनी नेहमी पुढचं पाहावं. मागचंच पाहात राहिलं तर पुढचा रस्ता कसा सापडावा?''

सावित्रीच्या हाताला धरून तिला खाली बसवीत आक्का म्हणाली,

''बाये, तू एक त्याला खमकी भेटलीस. याच्या डोळ्यासमोरून अजून काही फणसवळ्याचं घर हालत नाहीय्...!''

''अहो, जन्मघराची ओढ कुणाला सुटली आहे का वन्सं? आता माहेर सोडून तीन वर्षं झाली मला. पण अजून शिरगावच्या वाडीतली फणशी येते डोळ्यासमोर. अस्सा घागरीएवढा फणस लागायचा. दोन दोन पराती गरे निघायचे...''

कपाळावरचा घाम पुशीत सावित्री म्हणाली.

''अगं, तुझ्या फणशीचं काय घेऊन बसलीस? आमच्या हरेश्वरच्या एका माडाला चांगला भोपळ्याएवढा नारळ लागायचा. दोन दोन तांबे पाणी. अगदी अमृताहूनही मधुर, खोबरं असं दळदार, खवलं की पंचवीस माणसांचे मोदक व्हायचे एका नारळात. पण एक दिवस तोच नारळ इकडच्या मस्तकात पडला, आणि माझं हे असं झालं. तू फणशी गमावलीस, सासरी आलीस. मी नारळ गमावला, माघारी आले. एकूण काय, आपल्या भाळी सटवाई जे लिहिते तेच खरं असतं!''